# वीर बाल दिवस
# (अल्प परिचय)

शिखांचे दहावे व अखेरचे गुरू असलेले गुरू गोविंदसिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांनी दिलेल्या बलिदानाच्या सन्मानार्थ २६ डिसेंबर हा दिवस सन २०२२ पासून दरवर्षी वीर बाल दिवस म्हणून साजरा केला जातो.

दि. २६ डिसेंबर, १७०४ रोजी पंजाबमधील सरहिंद येथे मुघल सैनिकांकडून साहिबजादा जोरावर सिंग आणि फतेह सिंग यांना कैद करण्यात आले होते. मुघल सैन्याने त्या दोघा बालकांना धर्म बदलण्यास भाग पाडले, तेव्हा त्या दोघाही बालकांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला .त्यामुळे त्या दोघा वीर बालकांना एका भिंतीत जीवंत गाडण्यात येऊन ठार मारण्यात आले. त्या वेळी साहिबजादा जोरावर सिंग ९ तर फतेह सिंग ६ वर्षांचे होते. बाल वयातच या बालकांनी शिख संप्रदायाचा सन्मान व अस्मिता राखून आपले बलिदान दिले. त्यांच्या गौरवार्थ व त्यांनी केलेल्या समर्पणाच्या सन्मानार्थ दरवर्षी २६ डिसेंबर हा दिवस देशभर वीर बालदिन म्हणून साजरा करण्यात येतो.

*********

स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ